मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८

राज्य शासनातर्फे प्रदान करण्यात आलेले अधिकार.

महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांक व्हीपीएम २६८९/१२३८[३३००]/२१,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२ दिनांक २१ जून १९८९.

वाचा :- १] शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीए १२७०/१५१३८-ई, दिनांक ८ डिसेंबर १९७०.

२] शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र. व्हीपीए १०८३/सीआर-१६७०/२१, दिनांक १ जून १९८३.

शासन निर्णय :-

मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ च्या कलम १८२ अन्वये राज्य शासन त्यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारापैकी काही अधिकार आयुक्त, तसेच राज्य शासनाचे इतर अधिकारी यांना शासकीय अधिसूचनेद्वारे प्रदान करु शकतात. त्यानुसार वेळोवेळी प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचे संकलन सोबतच्या विवरणपत्रात दर्शविले आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
[ वृं. श्री. कुळकर्णी ]
सह सचिव, महाराष्ट्र शासन,

प्रति,

शासन निर्णय, ग्राम विकास विभाग क्र. व्हीपीएम २६८९/१२३८[३३००]/२१, दिनांक २१ जून १९८९ चे सहपत्र.

| अ.क्र. | राज्य शासनाचे मुंबई ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ खालील अधिकार [अधिनियमाचे कलम] | अधिकार प्रदान करण्यात आले त्या अधिकाऱ्यांचे नाव | सदर अधिकाऱ्यांनी वापरावयाचे अधिकार |
|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. |
| १. | ४ | विभागीय आयुक्त | सर्व |
| २. | १४[अ][एक]आणि [दोन]व [ड] | --"-- | सर्व |
| ३. | १६[२] | --"-- | सर्व |
| ४. | ४०[२] | --"-- | सर्व |
| ५. | ५०[२]आणि[४] | --"-- | सर्व |
| ६. | १२४[६] | --"-- | सर्व |
| ७. | १२७[४] | --"-- | सर्व |
| ८. | २७[२] | सर्व जिल्हाधिकारी | सर्व |
| ९. | ५१[१अ] | --"-- | ग्रामपंचायतीकडे ज्या प्रयोजनासाठी मालमत्ता निहित केली असेल त्या प्रयोजनासाठी त्याच पंचायतींना मालमत्ता आवश्यक नसल्यास अथवा गावठाण स्थापन करणे किंवा एखाद्या गावातील गावठाणाची हद्द वाढविणे अथवा भटक्या जमाती आणि विमुक्त जमाती यांच्या वस्तीसाठी भूखंड अथवा पूरग्रस्त किंवा पुराचा धोका निर्माण झालेल्या व्यक्तींच्या पुनर्वसनासाठी परत घेणे.<br>स्पष्टीकरण :- कोणतीही जमात ही अनुसूचित अथवा विमुक्त जमात आहे किंवा कसे अथवा एखादी व्यक्ती मागासवर्गीयातील आहे किंवा कसे याबद्दल संदेह निर्माण झाल्यास सदर प्रश्न शासनाकडे विचारार्थ पाठविण्यात यावा व त्यावरील शासनाचा निर्णय अंतिम समजण्यात यावा. |

| १. | २. | ३. | ४. |
|---|---|---|---|
| १०. | १२७[अ] | सर्व जिल्हाधिकारी | सर्व अधिकार, तथापि जमीन महसूलावरील उपकरांची वसुलीची माफी अथवा तहकुबी ही जास्तीत जास्त जमीन महसुलाच्या माफी अथवा तहकुबीच्या समान असेल आणि ज्या ठिकाणी जमीन महसुलाला तहकुबी अथवा माफी नसेल त्या ठिकाणी देण्यात येणार नाही. |
| ११. | १५०[१] | --"-- | सर्व |
| १२. | १६०[१][फ] | --"-- | सर्व |
| १३. | १६८[अ][१] | --"-- | सर्व |
| १४. | १७६[२][तीन] | --"-- | प्रत्येक पंचायतीमध्ये अनुसूचित जाती व अनुसूचित जमातींकरिता राखून ठेवण्यात यावयाच्या जागा विहित करण्यासाठी निधम तयार करण्याशी संबंधित असेल तेवढयाच बाबींपुरते. |
| १५. | १८५[२][ब] | जिल्हा परिषदांचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी. | सर्व |
| १६. | १५९[१][ब] | --"-- | सर्व |
| १७. | १६०[१][ब] | --"-- | सर्व |
| १८. | १४५[१][अ] | सर्व विभागीय आयुक्त | सर्व |